**महाराष्ट्र शासन**
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३४६०३/२६१२२०७६** **Email ID : ddtp.ho@maharashtra.gov.in**
**ddtpho_pune@rediffmail.com**

श्री. कंठाळे 3/4/25
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक,नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 764 दिनांक- 03.04.25
संबंधित अधि./कर्म.
न.र. 3-4-25
उ.स.न.र.

**प्रारूप नगर रचना योजना वणी क्र.१, जि.यवतमाळ**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम ६८(२) अनुसार मंजूर करणेबाबत.

**निर्णय क्र.:** न.र.यो ./ वणी /मंजूरी /कलम ६८(२)/ टिपीव्ही-६/१६७६ , दि. २८.०३.२०२५.

सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करावी.

**(मसूदा मा. संचालक यांनी मंजूर केला असे)**

**(श. म. निकम)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकरिता

**प्रति,**

१. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबत पाठविलेली अधिसूचना (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या ५ छापील प्रती नगर रचना संचालनालयास व प्रत्येकी ५ छापील प्रती सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती आणि सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांना पाठवाव्यात.

२. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**प्रत:-**

३. मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-०१), मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

४. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

५. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

(कृ. मा. प.)

६. सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

७. मुख्याधिकारी, वणी नगर परिषद, ता. वणी , जि. यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३४६०३/२६१२२०७६** **Email ID : ddtp.ho@maharashtra.gov.in**
**ddtpho_pune@rediffmail.com**

**अधिसूचना**

दि. २८.०३.२०२५

क्र. न.र.यो/ वणी /मंजूरी / कलम ६८(२)/ टिपीव्ही-६/ १९७९

ज्याअर्थी, वणी नगर परिषदेने (यापुढे '**उक्त नगर परिषद**' असे संबोधिले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे '**उक्त अधिनियम**' असे संबोधिले आहे) चे कलम ६० उपकलम १ चे तरतूदीन्वये प्राप्त अधिकारात ठराव क्र.०१, दि.२२.०९.२०२३ अन्वये वणी नगर परिषद हद्दीतील क्षेत्राकरीता प्रारूप नगर रचना योजना तयार करणेबाबत इरादा जाहीर केला आहे व त्याबाबत उक्त अधिनियमाचे कलम ६० उपकलम (२) चे तरतूदीन्वये इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २८ डिसेंबर, २०२३ ते ३ जानेवारी, २०२४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर परिषदेने सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांचेशी सल्लामसलत करून ज्या क्षेत्रासाठी नगर रचना योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे, त्या क्षेत्रासाठी प्रारूप नगर रचना योजनेचा मसुदा तयार केला आहे (यापुढे '**उक्त प्रारूप नगर रचना योजना**' असे संबोधिले आहे) व उक्त प्रारूप नगर रचना योजना उक्त अधिनियमाचे कलम ६१ उपकलम (१) चे तरतूदीन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १६ डिसेंबर, २०२४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१३/३२११ / सीआर-५०८ / नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार उक्त अधिनियमाच्या कलम ६८ उपकलम (२) चे तरतूदीन्वये नगर परिषद क्षेत्रातील प्रारूप नगर रचना योजना मंजूर करणेचे शासनाचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाचे कलम १५१ उपकलम (१) चे तरतूदीन्वये प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर परिषदेने उक्त प्रारूप नगर रचना योजना प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित बाधित व्यक्तींकडून एकही सूचना / हरकती प्राप्त झालेल्या नसल्याने उक्त नगर परिषदेने त्यांचे अभिप्रायासह उक्त अधिनियमाचे कलम ६८ उपकलम १ चे तरतूदीन्वये उक्त प्रारूप नगर रचना योजना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीकरीता विहीत मार्गाने सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर परिषदेने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केलेली उक्त प्रारुप नगर रचना योजना सादर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत मंजूर करणे अथवा नामंजूर करणेबाबत संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाकडील उक्त दि. ०१.१२.२०१६ रोजीच्या आदेशातील परंतुकामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश क्र. डिटीपी / पावर डेलिगेशन / सेक्श. १५१(२)/ टिपीव्ही-७/ ३४८३, दि. ०६.०६.२०१८ नुसार, उक्त अधिनियमाचे कलम ६८, उपकलम (२) चे तरतूदींमध्ये नमूद केल्यानुसारचे सल्लामसलतीचे अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना उक्त अधिनियमाचे कलम १५१ उपकलम (२) चे तरतूदीन्वये प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, विभागीय सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग यांनी पत्र क्र. २४९, दि.२६.०३.२०२५ अन्वये उक्त प्रारूप नगर रचना योजना बाबत सल्लामसलत दिली आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व विभागीय सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त प्रारूप नगर रचना योजना, पुढील अटींसह मंजूर करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ६८ उपकलम (२) बाबत प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे उक्त नगर परिषदेने तयार करुन प्रसिद्ध केलेली व सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग यांच्या कार्यालयाकडून तपासणींती सादर केलेली उक्त प्रारुप नगर रचना योजना प्रसिद्ध केल्याप्रमाणे मंजूर करीत आहे.

अटी :

अ) मंजूर करण्यात आलेली उक्त प्रारूप नगर रचना योजना, वणी क्र. १ ही सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येण्याची तारीख राहील, असे निश्चित करीत आहे. ज्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम ६८-अ चे तरतूदीनुसार संबंधित भूखंड / जागा निहित होणेचा अंमल लागू होत आहे.

ब) वणी नगर परिषद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ६८-अ चे तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसार भूखंड / जागांचा ताबा घेणेचे निर्देशित करीत आहे.

क) उक्त प्रारूप नगर रचना योजना मंजूरीची सदर अधिसूचना वणी नगर परिषदेच्या कार्यालयामध्ये कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत आम जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध ठेवण्याचे निर्देशित करीत आहेत.

ड) उक्त प्रारूप नगर रचना योजना अधिप्रमाणित प्रती किंवा त्यातील संबंधित भागांच्या प्रती आम जनतेला अर्ज करून माफक दरात विक्रीसाठी वणी नगर परिषदेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध ठेवण्याचे निर्देशित करीत आहेत.

सदरची अधिसूचना ही संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पुणे-४११००१.
दि. २८.०३.२०२५.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

**Maharashtra State**
**Directorate of Town Planning and Valuation**
**Department, Central Building, Pune 411 001**

**Telephone No. 020-26134603/26122076** **Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in**
**ddtpho_pune@rediffmail.com**

## NOTIFICATION

Dated - 28.03.2025.

No. TPS- Wani/Sanction/ Section 68(2) / TPV- 6/ 1676

Whereas, the Wani Municipal Council (hereinafter referred to as '**the said Municipal Council'**) in exercise of the powers vested in it under the provisions of sub-section (1) of section 60 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as **'the said Act'**) by its Resolution No.01, dated 22.09.2023, declared its intention to make the draft Town Planning Scheme, Wani for the area comprised in that scheme and published the declaration so made in accordance with the provisions of sub-section (2) of Section 60 of the said Act in the Maharashtra Government Gazette, on date 28 December, 2023- 03 january, 2024;

And whereas, the said Municipal Council, after consultation with the Joint Director of Town Planning, Amaravati Division, Amaravati made a draft Town Planning Scheme, Wani (hereinafter referred to as **'the said Draft Town Planning Scheme'**) for the area in respect of which the declaration was made as aforesaid and published the said draft scheme in the Maharashtra Government Gazette, dated 16 December, 2024 and in the other prescribed manner as required under the provisions of sub-section (1) of Section 61 of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department vide Notification No. TPS- 1813/3211/ CR -508/ UD-13, dated 01.12.2016, has delegated the powers exercisable by it, under the provisions of section 68(2) of the said Act, in respect of all Municipal Councils and Nagar Panchayats, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under the provisions of section 151(1) of the said Act;

And whereas, the said Municipal Council has submitted the said Draft Town Planning Scheme alongwith their remarks and also mentioning therein that, no any suggestions/objections relating to the said draft Town Planning scheme from the persons affected thereby, as required by the provisions of sub-section (1) of section 68 of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and has applied for sanction vide its letter dated 06.03.2025 through proper channel;

And whereas, it is necessary for the Director of Town Planning to accord sanction to or refuse to accord sanction to the said Draft Town Planning Scheme within a period of three months from the date of submission of the said scheme to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by the said Municipal Council;

And whereas, as directed under the provisons of the said notification, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has delegated the powers of consultation as laid down in section 68 (2) of the said Act to the concerned Divisional Joint Director of Town Planning, under his Order No. DTP/Power Delegation/Sec.151(2)/TPV-7/3483, dated 06.06.2018;

And whereas, the Divisional Joint Director, Amaravati Division vide letter No.249, dt. 26.03.2025, has offered consultation on the said Draft Town Planning Scheme;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after making such inquiry as thought fit and after consulting the Joint Director of Town Planning, Amaravati Division proposes to sanction the said draft Town Planning Scheme, Wani subject to following conditions;

Now, therefore, in exercise of the powers conferred by the provisions of sub-section (2) of Section 68 of the said Act, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the said Draft Town Planning Scheme as per prepared and published it by the Chief Officer, Municipal Council, Wani and which is after checking submitted by the Divisional Joint Director, Town Planning ,Amaravati Division .

**Conditions;**

(a) Fixes date of publication of this notification in the Maharashtra Government Gazette as the date of coming into force the said sanctioned Draft Town Planning Scheme, Wani No. 1, which shall have effect as provided in the provisions of section 68- A of vesting of such plots ;

(b) Directs that the lands thereunder shall be taken into possession by the Wani Municipal Council as stipulated under the provisions of section 68 A;

(c) Directs that the said Town Planning Scheme, Wani as sanctioned shall be kept open for inspection by the public during office hours on all working days in the head office of the Wani Municipal Council;

(d) and directs that the copies of the said draft scheme or extracts there from certified to be correct shall be available for sale to the public on application at a reasonable price at the office of the Wani Municipal Council.

This notification is also made available on the website www.dtp.maharashtra.gov.in of the Directorate.

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT DIRECTOR OF TOWN PLANNING M.S. PUNE

Pune – 411 001
Date : 28.03.2025

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune

*******